■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३१० ■ सोमवार दि.२८ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 310 ■ Monday Dt. 28 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# स्व.एकनाथ आव्हाड यांनी हजारो गायरान धारकांना मिळून दिलेली गायरान जमीन आ.प्रकाश सोळंके करतायत हिसकावण्याचा केविलवाणा प्रयत्न!

**मंत्री करा म्हणणं सोपं! जागेवर बसले तर उठता येईना, तरी म्हणतात मला मंत्री करा एवढं सोपंय का मंत्रीपद?**

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


**जातीवादाचं बोट दाखवणाऱ्या आ.प्रकाश सोळंकेंनी गायरान जमिनीवर शासकीय योजना आणल्या याबद्दल स्पष्ट बोलावं?**

## आहो.. प्रकाश दादा तुम्ही निवडणूक जिंकली ती फक्त मराठा समाजाच्या मतांवर नाही जिंकली!

# साऱ्या अठरापगड समाजाने तुम्हाला साथ दिली, मग आज तुम्ही फक्त जातीचा मुद्दा का उचलता?

## आ.प्रकाश सोळंकेंनी २५ वर्षे सत्तेचा मेवा चाखला आता शेवटच्या आमदारकीला 'जात' आठवली, आणि जातीचा दाखला देत मंत्रिपदाची अपेक्षा केली?

बीड । प्रतिनिधी



माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्याकडून सध्या मंत्रिपदासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. मात्र त्यांच्या मागण्यांमागचं कारण 'जातीय असंतोष' असल्याचे त्यांनी एका मुलाखतीत व्यक्त करताच, आता सामान्य जनतेमध्ये उपहासात्मक प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. सोशल मीडियावर आणि गावपातळीवर एकच चर्चा सुरू आहे. आता हे काय? आमदार जागेवर बसला तर उठता येत नाही, अन म्हणतो मला मंत्री करा, लोकप्रतिनिधींनी विकासकामांवर भर द्यायचा सोडून वैयक्तिक मंत्रिपदासाठी अशी धडपड करावी का, असा सवाल आता मतदार विचारू लागले आहेत. मंत्रिपद मिळण्यात माझी जात आडवी येते. मी जर ओबीसी वर्गातून जन्माला आलो असतो, तर मला महान संधी मिळाली असती असे बोलणारे आमदार प्रकाश सोळंके सध्या चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. मात्र त्यांचे हे विधान करताना माजलगाव मतदारसंघातील अठरापगड जातींच्या कष्टाने दिलेल्या मतांचे योगदान त्यांना दिसले नाही का?, असा थेट सवाल आता सामान्य जनतेतून आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांतून उपस्थित केला जातोय. तुम्ही निवडणूक जिंकलीत ती फक्त मराठा समाजाच्या मतांवर

पान २ वर

### स्वर्गीय एकनाथ आव्हाड यांनी गायरान धारकांना दिलेली जमीन, प्रकाश सोळंकेंचा हिसकावण्याचा प्रयत्न?

माजलगाव तालुक्यातील अनेक गावे आणि वस्तीवरील हजारो भूमिहीन व गायरान धारकांना न्याय मिळवून देणारे स्व.एकनाथ आव्हाड यांची पाठराखण करणाऱ्या लोकांमध्ये सध्या संतापाची लाट उसळली आहे. कारण त्याच गायरान जमिनीवर आमदार प्रकाश सोळंके यांनी हस्तक्षेप करत ती जमीन परत घेण्याचा केविलवाणा प्रयत्न केल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. स्व.एकनाथ आव्हाड यांनी हजारो गायनधारकांना गायरान जमिनी सरकारकडून ग्रामस्थांच्या मालकीहक्कात आणून दिल्या. त्यामुळे अनेक गरजू कुटुंबांना हक्काची जमीन मिळाली, घरे उभी राहिली आणि जगण्याची नवी उमेद मिळाली, स्व.एकनाथ आव्हाड यांनी गायरान जमीन दिली, तर प्रकाश सोळंके तीच जमीन पुन्हा हिरावून घेऊ पाहतात, अशी भावना सध्या ग्रामीण भागात रुजली आहे. हे प्रकरण केवळ राजकीय नसून मानवी हक्काशी संबंधित असल्याने, प्रशासनाने यामध्ये पारदर्शक भूमिका घ्यावी, अशी मागणी आता जनतेतून उठू लागली आहे.



### जातीच्या चष्म्यातून मंत्रीपद मागणाऱ्या आमदार प्रकाश सोळंकेंना जनता आता जातीचा चष्मा दाखवणार?

हजारो दिन दलित शोषित वंचितांना गाव वाडी वस्ती वाड्याच्या बाहेर राहणाऱ्या अठरापगड जातीला सोबत घेऊन गायरानाचा लढा उभा केला तो ढाण्या वाघ म्हणजे, स्वर्गीय एकनाथ आव्हाड यांनी हजार एकर महाराष्ट्रामध्ये अनेक भूमिहीन दिन दलित शोषित पिढीत्यांना मिळवून दिले माजलगाव मतदार संघामध्ये असेल किंवा केज तालुका अंबाजोगाई तालुक्यांमध्ये सोलार चे अनेक प्लॉट पवनचक्कीचे प्लॉट हे बीड जिल्ह्यातील राज्यकर्ते आजी-माजी आमदार पालकमंत्री मंत्री खासदार हे त्या गायरानधारकांच्या पोटात पाय देण्यासाठी आणत आहेत का? आमकासात प्रकार माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी केला आहे. हजार वरती अनेक प्रकल्प उभे करून प्रकाश सोळंकेने स्वतःची आर्थिक पोळी भाजून घेण्यासाठी आपले खिसे भरण्यासाठी व आपल्या कार्यकर्तेच खिसे भरण्यासाठी विविध योजना गायरान जमिनीवर का याचे उत्तर आमदार प्रकाश साळुंके यांनी द्यावे? आमदार प्रकाश सोळंके यांच्या ऊरावर हेच गायरान धारक बसणार आहे यामध्ये शंका नाही.

### गोरगरिबांकडून गायरान जमिनी हिसकावण्याचा डाव रचता, हे दुहेरी राजकारण नाही का?

प्रकाश सोळंके यांच्यावर आरोप आहे की, त्यांनी गायरान जमीन पुन्हा ताब्यात घेण्याचा केविलवाना प्रयत्न केला. यामुळे आधीच मिळालेल्या मालकी हक्कांना आणि घरकुल लाभार्थ्यांना धोका निर्माण झाला आहे. आपल्याला मंत्रिपद मिळत नाही याचे कारण मी मराठा आहे म्हणूनच मला डावललं जातं असे वक्तव्य केल्याने सध्या ते चर्चेत आहेत. त्यांनी गायरान जमिनीवर शासकीय योजना आणल्या याबद्दल स्पष्ट बोलावं, जातीचा मुद्दा पुढे करून सहानुभूती मिळवायचा प्रयत्न करणाऱ्या सोळंकेंनी पूर्वी स्वतःच शासकीय योजना गायरान जमिनीवर आणल्या याबद्दल स्पष्ट बोलावं आता जनतेतून थेट असे सवाल विचारले जात आहेत.

### दलितांचा विश्वास मिळवून आमदारकी मिळवणाऱ्या सोळंकेंनी गायरानसाठी का नाही उचलला आवाज?

तालुक्यातील अनेक गावांमध्ये गायरान जमिनीवर हक्क मिळवून वास्तव्यास आलेले गायरान धारक हे प्रामुख्याने दलित समाजातून आहेत. हेच गायरान धारक मतदानाच्या वेळेस प्रकाश सोळंके यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. पण आज त्याच समाजाच्या गायरान हक्कासाठी लढण्याऐवजी आ. सोळंके मौन बाळगून आहेत, यावरून स्थानिकांत तीव्र संताप व्यक्त होत आहे. आगामी निवडणुकांमध्येही दलित मतदार हा निर्णायक घटक राहणार आहे. २०१९ आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत गायरान वस्त्यांमधील दलितांनी मोठ्या प्रमाणावर प्रकाश सोळंके यांना मतदान केले. गायरान जमिनीवर जगणाऱ्या दलितांना हक्काचे घर हवे आहे, पण त्यांना निवडून दिलेल्या आमदाराचा पाठिंबा मात्र हवेत विरलेला दिसतो. दलित मतदारांनी सोळंकेंना दिलेला पाठिंबा विसरला गेला की मुद्दाम दुर्लक्षित केला जातोय हे प्रश्न आता जनतेपुढे आ वासून उभे आहेत.

## जुगार अड्ड्यावर धाड, ३० लाखांचा मुद्देमाल जप्त

### नऊ जुगारी पोलिसांच्या ताब्यात, बीड ग्रामीण पोलिसांची कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड-नवगण राजुरी रस्तयावर चऱ्हाता फात्या नजिक तळेगाव शिवारात पत्त्याच्या क्लबवर बीड ग्रामीण पोलिसानी धाड ताकुन रिपोल्पो रूपंचा माल जप्त केल्याची इवेंट रविवारी सायंकाळी घडली।



याबाबत पोलीस सूत्राकून समजलेले मोर माहिती आशी की, तळेगाव सिटीतिल सम्राट बिअर बरच्या पाठिमागिल अभिनव क्रीडा और सांस्कृतिक मंडल तळेगाव आसा बोर्ड लावेल्या एका बिल्डिंगिट पट्टायावर पैसे लावून तिराट नवाचात जुगर खेतत असल्याची गुप्त माहिती बीड ग्रामीण पोलियाना मिलली टायसन बीड पोलीस थान्याचे पोलिस पर्यवेक्षक मारुति खेदकर यांच्या टीमने सदर ठिकाणी धाड ताकुन पत्त्यावर पैसे लवून तिरट नवाचा जुगार खेत अस्ताना दीपक अंबादास गायकवाड (वैय ३६ वर्ष रा. पाली), हनुमान लक्ष्मण सुरवशे (वैय ३६ वर्ष रा. आखेरचिंचोली), लक्ष्मण लक्ष्मी नेवले (वैय ५४ वर्ष रा. पाली), श्याम आनंदराव वीर (वैय ६१ वर्ष रा. पाली), श्याम आनंदराव वीर (वैय ६१ वर्ष रा. पाली), श्याम आनंदराव वीर (वै. बीड),

पान २ वर

## जिल्हा वाहतुक शाखेची नेकनूर परिसरात कारवाई

### १०९ केसेस करुन ७३ हजाराचा ठोठावला दंड फौजदार जाधवर यांची सिंघम कारवाई

बीड । प्रतिनिधी



बीड जिल्हा वाहतुक शाखेच्या वतीने पोलीस अधिक्षक नवनीत, अप्पर अधिक्षक सचिन, जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष, नेकनूर पोलीस स्टेशनचे गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली नेकनूर येथे आज आठवडी बाजार असल्याने बसस्टॅण्ड वरल मुख्य रस्त्याचा परिसरात वाहतुकीस अडथळा आणणार्या व वाहन नियमांचे उल्लंघन करणार्या १०९ वाहनधारकांवर कारवाई करुन ७३ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला व एकाविरुद्ध लायसन निलंबन प्रस्ताव पाठविण्याची तजवीज ठेवली आहे. वाहतुक शाखेने केलेल्या या कार्यवाहीमुळे बेकायदेशीर वाहनधारकांची धांदल उडाली होती.

पान २ वर

## महिलेस फोनवर अश्लिल संभाषण व शिवीगाळ करणाऱ्या माजी मुख्याध्यापकावर पुन्हा गुन्हा दाखल

केज । प्रतिनिधी

जुन्या भांडणाच्या कारणावरून एका महिलेस अश्लिल संभाषण व शिवीगाळ करणाऱ्या माजी मुख्याध्यापक तथा वकील महेबुब काझी याच्यावर केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत मांडवा ता. वाशी, जि.उस्मानाबाद -धाराशिव (हल्ली मुक्काम केज, जि.बीड) येथील आसिया सलाहुद्दीन काझी यांनी दिनांक २५ जुलै २०२५ रोजी केज पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यात फिर्यादी यांनी म्हटले आहे की, दि.२४ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ०६:२७ वाजण्याच्या सुमारास त्यांचा सख्खा दिर ॲड. मेहबुब काझी (निवृत्त मुख्याध्यापक) याने मांडवा, ता.वाशी येथील फिर्यादीच्या प्रॉपर्टी बाबत बोलणे सुरु करून फिर्यादींना अश्लील भाषेतसंभाषण व शिवीगाळ केली. म्हणून केज पोलिस ठाण्यात फिर्यादींच्या तक्रारीवरून आरोपी मेहबुब काझी याच्या विरुध्द भारतीय न्याय संहितेचे कलम ७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस कॉन्स्टेबल त्र्यंबक सोपने हे करीत आहे.

यापुर्वीही व्हाट्सपवर एका महिला आणि लहान मुलीबाबत अश्लिल व अभद्रभाषेत टिप्पणी केल्याप्रकरणी आरोपी महेबुब काझी याच्याविरुध्द दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी मुंबई येथील माता रमाबाई आंबेडकर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेचे कलम ७९ आणि ३५६ (२) प्रमाणे गुन्हादाखल झाल्याने त्यास मुंबई पोलिसांच्या वतीने अटक करून जामीना वर सोडण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे दि.०६ जुलै २०२५ रोजी आरोपी मेहबुब काझी, त्याची मुलगी ड.फिजा काझी, त्याचा मुलगा जाहेद काझी आणि पत्नी शाहीन काझी या चौघांविरुध्दही पोलिस ठाणे वाशी

पान २ वर

# कुरेशी समाजाच्या लोकांविरुद्ध होत असलेले अत्याचार, अन्याय व खोटया कार्यवाहीचा निषेध

## तहसील कार्यालयावर कुरेशी समाजांचा मोर्चा, उपजिविकेचे प्रश्न मार्गी लावा निवेदनाद्वारे मागणी

दौलावडगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील कुरेशी समाज यांचा वडीलोपार्जीत जनावरे खरेदी विक्रीचा व्यवसाय करीत आहे व शेती व्यवसाय करीत आहे. व स्वत:ची व कुटुंबीयांची उपजिवीका भागवीत आहे. पण कुरेशी समाज हा शासनाने निबंध घातलेले कोणतेही जनावर खरेदी विक्री कटींग करीत नाही तसेच शासनामार्फत जे जनावरांचे बाजार आहे त्यातुनच सर्व प्रक्रिया करून व्यवसाय करीत आहे.काही गुंड प्रवृत्तीचे लोक आपली पोळी भागविण्याकरीता कुरेशी समाजाला टार्गेट करून व्यवसाय करू देत नाही व खंडणीची मागणी करीत आहे.

समाजाच्या लोकांना अडवणुक करून त्यांचे कडील जनावरे हिसकावुन घेत आहे तसेच त्यांचे कडील पैसे देखील हिसकावुन घेत आहे व जबर मारहाण करून दहशत निर्माण करीत आहे त्यामुळे कुरेशी समाजाला कामधंदा करणे व शेती व्यवसाय करणे शक्य राहीले नाही व शासन दरबारी कोणी दखल घेत नाही व कुरेशी समाजाचे लोकांनवर उपासमारीची वेळ आली आहे. गुंड संघटना पोलीस यंत्रनेवर दबाव आणुन कुरेशी समाजाचे लोकांचा काहीएक दोष नसतांना खोटे गुन्हे दाखल करून घेण्यास दबाव आणत आहे व त्याचे दबावापोटी पोलीस यंत्रना कसलीही सहानिशा न करता त्यांच्या वर खोटे गुन्हे दाखल करू अशा धमक्या देतात तसेच कुरेशी समाजातील लोकांनी त्यांना झालेल्या मारहाणी बाबत तकार पोलीस स्टेशन येथे दिली तर त्याची तक्रारही घेतली जात नाही आमचे संविधानीक हक्क व अधिकार सर्व धोक्यात आलेले आहे.याबाबत आष्टी तहसील कार्यालयावर कुरेशी समाजांच्या वतीने मंगळवार दि २२ जूलै रोजी दुपारी भव्य मोर्चा काढण्यात आला यावेळी तहसीलदार वैशाली पाटील यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

> कुरेशी समाजावर उपासमारीची वेळ आल्यामुळे मायबाप सरकारने सर्व समाजाची समस्या दुर करावी व योग्य ते निर्देष संबंधीतास दयावे व आमच्या गरीबांवर का अन्याय करता मोठ मोठ्या कंपनीवर कारवाई करावी व बाहेर देशात जो निर्यात होतो त्यांना थांबावे व आमच्या गरीबांवर होणारा अन्याय थांबवा आणि शासनाने आम्हाला न्याय मिळवून द्यावा.
>
> **– माजी नगरसेवक तथा हाजी सादीक कुरेशी आष्टी**

तालुक्यातील काही गावांमध्ये कुरेशी समाजावर सतत अन्याय होत आहे व कुरेशी समजाच्या अडी अडचणी कोणीही शासन दरबारी दखल घेत नाही व त्यामुळे कुरेशी समाजाचे संविधानिक हक्क व अधिकार धोक्यात आलेले आहे. शासनाचे कुरेशी समाजाकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले ते न करता कुरेशी समाजाचे समस्या जाणुन घ्यावे व त्याचे अन्न व उपजिविकेसाठी योग्य तो निर्णय घ्यावा त्याचे अडीअडचणी समजुन घ्यावे त्याचे निवारण करावे त्यासाठी सदरचे निवेदन तहसीलदार यांच्या शासन दरबारी दिले आहे. या मोर्चात माजी नगरसेवक तथा हाजी सादीक कुरेशी, शाकीर कुरेशी, वहाब कुरेशी, इरफान कुरेशी, तय्यब कुरेशी, राजु सौदागर, अन्सार कुरेशी, रऊफ कुरेशी, माजी ग्रामपंचायत सदस्य शफ्फी कुरेशी, सिराज कुरेशी, आयाज कुरेशी, शरीफ कुरेशी, शारूख कुरेशी, दौलावडगाव येथील माजी उपसरपंच बबलू कुरेशी, खडकत येथील ग्रा प सदस्य मौहमद कुरेशी आदी मोठ्या संख्येने आष्टी तालुक्यातील कुरेशी समाज बांधव सहभागी झाले होते. यावेळी कुरेशी समाजांच्या मोर्चाला रिपाइं आठवले गटांचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी पाठिंबा दिला.

# खा.बजरंग सोनवणे यांच्या संकल्पनेतून दिव्यांगासाठी पूर्व तपासणी नोंदणी शिबिर संपन्न

## शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद ९०० नागरीकांनी घेतला सहभाग



दौलावडगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या संकल्पनेतून येडेश्वरी फाउंडेशन, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्ष, दिव्यांग सेल बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी येथे दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी कृत्रिम अवयव सहाय्यभूत साधने मोफत वाटपासाठी पूर्व तपासणी व नोंदणी शिबिर शुक्रवार दि. २५ जुलै २०२५ रोजी घेण्यात आले. नागरिकांनी या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद देत ९०० दिव्यांग व जेष्ठ नागरीकांनी सहभाग नोंदवला आहे.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रदेश युवक अध्यक्ष महेबूब भाई शेख, ज्येष्ठ नेते आण्णासाहेब चौधरी, मा. जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. शिवाजीराव राऊत, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी युवक बीड जिल्हाध्यक्ष सतिष आबा शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी युवक तालुका अध्यक्ष विजय अण्णा गाढवे, रिजवान भाई शेख, भुसारी साहेब केज, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, मा. शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, समाजसेवक अशोक अण्णा पोकळे, डॉ. संतोष जाधव, आरोग्य दूत रामेश्वर गवळी, शिरिष थोरवे, दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड सर, संदीप जगदाळे, सोनू तळेकर, सुरेश पवार, राजकुमार थेटे, रामचंद्र खिळे आदी उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना महेबूब भाई शेख म्हणाले की, खा. बजरंग बप्पा सोनवणे यांनी एक चांगला व स्तुत्य उपक्रम राबवला असून हा उपक्रम दिव्यांग बांधवांसाठी लाखमोलाचा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. मा. जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. शिवाजी राऊत म्हणाले की, खा. बजरंग बप्पा सोनवणे यांनी हा उपक्रम योग्य व सुनियोजित राबवला आहे. तसेच हा उपक्रम दिव्यांग बांधवांसाठी अतिशय उपयोगी आहे. त्यामुळे या शिबिराचा दिव्यांग बांधवांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ नेते अण्णासाहेब चौधरी म्हणाले की, यापुढेही अशा शिबिरांची आवश्यकता आहे. परंतु गाव खेड्यातील प्रत्येक दिव्यांग बांधवांपर्यंत या शिबिराची माहिती पोहोचविण्यासाठी ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका यांनी संबंधित दिव्यांग बांधवांना कॅम्प बद्दल माहिती देऊन इथपर्यंत आणण्याची जबाबदारी घ्यावी असे मत त्यांनी व्यक्त केले. तर गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने म्हणाले की, पाच टक्के दिव्यांगांचा निधी लवकरच वाटप करू व भविष्यात दिव्यांग बांधवांना कॅम्प बद्दल पूर्वकल्पना देऊन माहिती देण्यासाठी ग्रामसेवक यांना सुचित करू असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. डॉ. संतोष काकडे म्हणाले की, खा. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या संकल्पनेतून दिव्यांग सेलच्या वतीने दिव्यांग बांधवांसाठी हा स्तुत्य उपक्रम राबवला असून पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील पाच टक्के दिव्यांग निधी वाटप करण्यात यावा अशी मागणी यावेळी त्यांनी केली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन युवा नेते महादेव डोके यांनी केले व दिव्यांग सेल राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. संतोष काकडे यांनी आभार मानले.

# टप्प्याटप्प्याने संपूर्ण अल्पसंख्यांक बहुलभागाचा विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध : विजयसिंह पंडित

## काम करणाऱ्यांच्या मागे खंबीरपणे उभे रहा : शेख निजाम



बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल मोमीन पुरा भागातील चंदा शाह मस्जिद परिसर येथे मागील अनेक वर्षापासून सिमेंट रस्ते नाल्या यासारख्या समस्या प्रलंबित होत्या सदरील प्रलंबित काम संदर्भात त्या भागातील नागरिकांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शेख निजाम यांच्याकडे मागणी केली व त्यांनी सदरील भागातील प्रलंबित कामांचा महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड जिल्हा ना. श्री अजित पवार साहेब ,माजी मंत्री मा.धनंजय मुंढे, प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित साहेब आमदार विजयराजे पंडित साहेब यांच्याकडे पाठपुरावा करून या भागातील लोकांची रस्ते व नाल्यांचे प्रश्न कायमस्वरूपी सोडून त्यांना आजपर्यंत होत असलेल्या त्रासापासून मुक्त करण्याचे काम केले.

सदरील झालेल्या विकास कामांचे लोकार्पण व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ दिनांक २७ जुलै २०२५ रोजी चंदा शाह मस्जिद परिसर येथे आयोजित करण्यात आला होता सदरील विकास कामांचे लोकार्पण गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी विजयसिंह पंडित यांनी आपल्या भाषणामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष मा. नामदार अजित दादा पवार कोणताही पक्षभेद मानत नसून पालकमंत्री या नात्याने बीड जिल्ह्याचा शहराचा विकास आराखडा त्यांनी तयार केलेला असून विशेषता अल्पसंख्यांक बहुल भागातील प्रलंबित असणारे प्रश्न लवकरच मोठ्या प्रमाणात सुटणार आहे व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत सर्व सामाजिक राजकीय व आर्थिक विकास साधणार आहे असे प्रतिपादन केले यावेळी बोलताना शेख निजाम यांनी आपल्या मनोगत मध्ये बोलताना म्हटले की गेल्या ३०–४० वर्षापासून इस्लामपुरा मोमीनपुरा गांधीनगर बालेपिर व इतर अल्पसंख्यांक बहुल भागांमध्ये फक्त उद्घाटनांची नारळ फोडण्यात आली परंतु प्रत्यक्षामध्ये कोणताही विकास या भागांचा करण्यात आलेला नाही या भागांचा फक्त वोट बँक म्हणून वापर करण्यात आलेला आहे यानंतर या भागातील लोकांनी काम करणाऱ्या लोकांच्या मागे खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन केले व भूलथापा देणाऱ्या व आपल्याला पॉकेट वोटिंग समजणाऱ्या लोकांना येणाऱ्या निवडणुकीमध्ये धडा शिकवावा असे आवाहन केले.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नवनियुक्त युवक जिल्हाध्यक्ष बळीराम आप्पा गवते व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कामगार आघाडीचे नवनियुक्त प्रदेश उपाध्यक्ष शेख अमर जैनुद्दीन यांचा सत्कार करण्यात आला यावेळी मौलाना आझाद आर्थिक विकास मंडळाचे संचालक तय्यब भाई लोकपत्रकार भागवत तावरे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस महादेव धांडे ,शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष गोपाल धांडे, नगरसेवक, हाफीज अश्फाक ,मोमीन जुबेर, आदी मान्यवर उपस्थित होते आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत या भागातील जेष्ठ कार्यकर्ते सत्तार भाई इनामदार शेख सरफराज व शेख निजाम मित्र मंडळाचे कार्यकर्त्यांनी केले.

पान १ वरून...

## आहो.. प्रकाश दादा तुम्ही निवडणूक जिंकली...

नाही. दलित, बहुजन, मुस्लिम, धनगर, ओबीसी, ब्राह्मण, कुणबी, साऱ्या अठरापगड समाजाने तुम्हाला साथ दिली. मग आज तुम्ही फक्त जातीचा मुद्दा का उचलता? अशा जनतेतून प्रतिक्रिया उमटत आहेत.

प्रकाश सोळंके हे माजलगावच्या राजकारणात एक जुने, प्रभावशाली आणि अनेकदा सत्ताधारी पक्षांमध्ये फिरणारे नेते आहेत. त्यांनी भाजप, कॉंग्रेस, राष्ट्रवादी अशा पक्षांमध्ये वेळोवेळी आपली जागा बदलली. मंत्रीपदही एकदा भोगले. पण त्या काळात त्यांनी जात, समाज, आरक्षण किंवा मागासवर्गीयांचा मुद्दा फारसा कधी मांडलेला दिसला नाही. परंतु, त्यांची २५ वर्षांची राजकीय कारकीर्द पाहता त्यांनी कधी जातीसाठी लढा दिला का? की सत्ता गाजवताना जात मागे टाकली आणि आता शेवटच्या श्वासाला तीच पुढे केली? असा सवाल सध्या सामान्य जनता आणि विविध सामाजिक कार्यकर्ते विचारू लागले आहेत.

## जुगार अड्ड्यावर धाड, ३० लाखांचा मुद्देमाल जप्त

भाऊसाहब रावसाह शेळके (रा. हिवरा पहाडी), सुभाष तुळशीराम शिंदे (वै. ५१ वर्ष रा. उमराद जहांगीर), भारत लक्ष्मण रत्न (वै. ५५ रा. बी. डी.), राधाकिसन शेशेराव लोंढे (वै. ४२ वर्ष रा. तळेगाव) यान्ना पाकडून त्यांची झडती घेतली असता तायांच्याकडून रोक ८२३० रुपये,,,७३ हजार रुपये रुपये किमतीचे मोबाइल, एक लाख रुपये किमतीच्या तीन मोटरसायकली, २१लाख रुमंच्या दोन कार असा एकून ३० लाख ४९ हजार ७३० रुपये चा माल जप्त केला.

नवोन्वेष क्रीड़ा एवं सांस्कृतिक मंडलाचे सचिव छत्रभुज भवानी वाघमारे वै ३९ वर्ष रा. हिवरा पहाड़ी हे सदर इस्मना पत्त्याचा तिरट नवाचा जु पगार नवोन्मेष क्रीड़ा और सांस्कृतिक मंडलाचे अनुज्ञापतितिल नियमाचे उल्लंघन करुण दारू और तम्बाकूजनसाइमाचा पुर्वथा करुण सार्वजनिक ठिकानि घनकगीचऱ्याचा अनपेक्षित केला वेरिल विवरणाचा मुद्दामल जा पंचमक्ष जप्त करून मुद्दामाल ताब्यात गेन्यात अला। याप्रकरण पो.हे.को. मच्छिन्द्र बडे यांच्या फिर्यादी वरूण बीडग्रामीण पोलीस थान्यात ९ लोकांविरुद्ध कलाम ते २३० भा.न्या.सं. कलम १२ (ए) मुजुका कलम ११६ महाराष्ट्र पोलिस अधिनियम प्रमाणे गुन्हा नंद करन्यात अला असून पुढील तपस पो.हे.का. फोटोग्राफर पठान हे करीत आहेत. सड कारवाईमुळे अवैद्य धन्यावल्याचे ढाबे दानले आहेत. ही कारवाई नवनीत सीओ बीडी पोलिस अधीक्षक, अप्पार पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, ग्रामीण पोलिस थाने पोलिस निरीक्षक मारुती खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली एस.पी.ओ.नि. बाळराजे दराद, पो.ह. मच्छिन्द्र बडे, फिरोज पठान, अतिश मोराळे, पो.ना. नामदेव सानप पो.शि. कांदे यानि केली.

## जिल्हा वाहतुक शाखेची नेकनूर परिसरात कारवाई

याबाबत सविस्तर माहिती अशी की, जिल्हा वाहतुक शाखेने आज विशेष मोहीम अंतर्गत नेकनूर परिसरात बेकायदेशीर वाहन धारकांना लगाम लागावा व वाहनाच्या नियमामध्ये सातत्य राहावे या हेतूने पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्या सहकार्याने सकाळी १० वाजण्याच्या सुमारास नेकनूर परिसरात आज आठवडी बाजाराचा दिवस असल्याने रस्त्यावरील नो पार्कींग वाहनांवर व रस्त्यावर वाहने उभे करुन वाहतुकीस अडथळा आणणार्या वाहनांवर तसेच विमा नसणे, पीयुसी नसणे, लायसन्स नसणे, हेल्मेट नसणे या सदराखाली १०९ वाहनधारकांवर कारवाई करुन ७३ हजार रुपये दंड ठोठावला असून नियमभंग करणार्यांवर पोलीस कारवाई करण्यात आली आहे. या कामीच पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्यासह पोलीस हवालदार सखाराम, पोलीस नाईक आदिनाथ, पोलीस अंमलदार टुले, शेख, नेकनूर पो.स्टे.चे खाडे व कदम, पोलीस ड्रायव्हर नारायण यांनी सहभाग नोंदवला तसेच विनाकागदपत्रे वाहने चालवू नका, वाहनांचे नियम पाळा, वाहतुकीस विनाकारण अडथळा करु नका असे आवाहन जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांनी केले आहे.

## महिलेस फोनवर अश्लिल संभाषण व शिवीगाळ

जि.उस्मानाबाद – धाराशिव येथे घरात घुसून अतिक्रमण करण्याच्या प्रयत्न केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेचे कलम ३२९(२),३२९ (३), ३५२ आणि ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल असून त्यातही नमुद चारही आरोपी जामीनावर आहे. तरीही नमुद आरोपींना कायद्याचा कोणताही धाक नसल्याने त्यांच्या गुन्ह्यांचे सत्र सुरुच आहे.

# एक यशस्वी व्यवस्थापक श्री शामराव कुलकर्णी



श्री.शामसुंदर कुलकर्णी
व्यवस्थापक/कार्यकारी संचालक

याजसाठी केला होता अट्टाहास.. या संतवचना प्रमाणे आपली ३७ वर्षाची सेवा पूर्ण करून करून आज ३१ जुलै २०२५ रोजी श्री श्यामसुंदर लक्ष्मीकांत कुलकर्णी सेवानिवृत्त होत आहे. गेवराई तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचे सुवर्ण महोत्सवी या वर्षात पतसंस्थेला वैभव प्राप्त करून देण्यात व्यवस्थापक श्री शामराव कुलकर्णी यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

श्री शामराव कुलकर्णी यांचा जन्म गेवराई तालुक्यातील चकलांबा या गावचा आहे. अत्यंत बेताच्या आर्थिक परिस्थितीत त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण चकलांबा येथे जिल्हा परिषद शाळेत झाले. दहावीनंतर १२वी, इ.लो पर्यंतचे शिक्षण बंकटस्वामी महाविद्यालय बीड येथे झाले. शिक्षण घेत असताना त्यांनी बीड मध्ये अनेक ठिकाणच्या सकाळी पूजा व सायंकाळी टेलरच्या दुकानांमध्ये, वाचनालयामध्ये कामे केली व स्वत:वरच घरच्या आर्थिक परिस्थितीला हातभार लावला.

पुढे च.लो चालू असताना त्यांना गेवराई तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेने त्यांचा सहकार क्षेत्रातील अनुभव पाहून त्यावेळच्या पाडळसिंगी येथील क्लार्कची तात्पुरती नोकरी दिली. एका खोलीत पतसंस्थेचा चालू झालेल्या त्यांच्या सेवेला आज ३७ वर्ष पूर्ण होत आहे. जवळपास ६ पंचवार्षिक निवडणूक व संचालक मंडळाचा कारभार त्यांच्या काळात संपन्न झाला. अत्यंत पारदर्शक आणि काटकसरीने खर्च करून त्यांनी पतसंस्थेची अतिशय उत्कृष्ट सेवा केली. गेवराई येथे १९९१ मध्ये त्यावेळेसचे अध्यक्ष श्री सटले व सचिव श्री श्रीधरराव मुळे सर व संचालक यांच्या पुढाकारातून गेवराई येथे श्रमसाफल्य या ठिकाणी पतसंस्थेचे स्थलांतर या संस्थेने घेतलेल्या जागेत करण्यात आले. एका खोलीत सुरू झालेला हा अर्थ प्रपंच आज तीन मजली इमारतीमध्ये मोठ्या दिमाखा त्यांच्याच काळात संपन्न झाला. पतसंस्थेचा वाढता व्यवहार व सभासद संख्या या सर्वांना तत्पर सेवा देण्यासाठी, नियंत्रण ठेवण्यासाठी संस्थेने श्री शामराव कुलकर्णी यांना पुढे त्यावेळेसचे चेअरमन श्री नारायणराव मोटे सर व संचालक मंडळाने त्यांना मॅनेजर म्हणून पदोन्नती दिली. श्यामराव कुलकर्णी आमच्या सर्वांसाठी एक प्रेरणादायी असे व्यक्तिमत्व आहे. अत्यंत खडतर परिस्थितीतून मात करून त्यांनी यश मिळवले होते. सेवाकाळात असताना सन २०१२ मध्ये शामराव कुलकर्णी यांना सर्वात मोठा धक्का त्यांचा पुत्र वारल्यानंतर झाला. अतिशय विदारक अशा परिस्थितीमध्ये त्यांनी स्वत:ला सावरून पतसंस्थेच्या कामांमध्ये परत एकदा झोकुन दिले. पतसंस्थेला गेल्या पाच वर्षांमध्ये मिळालेल्या वेगळ्या पुरस्कारामध्ये त्या त्या वेळेच्या संचालक मंडळाने केलेल्या कार्याबरोबरच संस्थेचे मॅनेजर शामराव कुलकर्णी यांचा बहुमूल्य असा वाटा आहे.

आदर्श कर्मचारी म्हणून ज्यादा वेतनवाढी देऊन संस्थेने त्यांना सन्मानित केलेले आहे.

मी ऊशव असताना १९८८ मध्ये बीडमध्ये आम्ही एका खोलीत राहत होतो. एक दिवस शामराव अचानक सकाळी गावाला जातो म्हणून गेले ते पंधरा दिवस आलेच नाही आम्हाला ते कुठे गेले तेही समजत नव्हते. त्यावेळी आजच्यासारखे फोन नाही नव्हते. त्यानंतर ते एकदम पंधरा दिवसांनी बीडला खोलीवर आले तेव्हा आम्हाला समजले त्यांना शिक्षक पतसंस्थेमध्ये नोकरी लागली आहे. त्यावेळेस त्यांच्या इतकाच आम्हा सर्वांनाही खूप आनंद झाला होता. चकलांबा गावच्या रोकडेश्वर नाट्य मंडळाचे रंगकर्मी असलेले श्री श्यामसुंदर कुलकर्णी यांनी आपल्या सेवाकाळात वेळ काढून अनेक नाटकात उत्कृष्ट नाट्य कलाकार म्हणून काम केले आहे.

श्याम कुलकर्णी यांनी भारतीय जीवन निगम (डखउ) मध्ये अनेक वर्षे एजंट म्हणून काम करून धारकांना चांगल्या पद्धतीने सेवा दिली. त्या माध्यमातून त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. बालपणीचे काळातील अतिशय खडतर परिस्थितीतून त्यांनी दिवस काढले होते. वडील कै.लक्ष्मीकांतराव कुलकर्णी, आई आनंदीबाई यांच्या तसेच त्यांना मिळालेले गुरुवर्य श्री एस.डी. कुलकर्णी सर, मल्हारी जाधव सर इ. गुरुजनांनी दिलेल्या सुसंस्कारातून त्यांनी पतसंस्थेची अत्यंत विश्वासाने सेवा केली. गेल्या पंचवीस वर्षापासून ते गेवराईच्या सुयोग शिक्षक गृह संस्थेमध्ये सर्वांना सोबत घेऊन राहत आहेत. अशा या आदर्श व्यवस्थापक, उत्कृष्ट नाट्य रंगकर्मी, अष्टपैलू व्यक्तिमत्त्वास सेवानिवृत्तीनंतरच्या कार्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा. त्यांचे पुढील आयुष्य सुखी, समाधानी दीर्घायुषी, उत्तम आरोग्य संपन्न जावो हीच शुभेच्छा..

**श्री सुलाखे धनंजय धर्मराज**
**(मुख्याधापक)**
जि.प.प्रा.शा.राजपिंपरी ता. गेवराई.

# वाढदिवस एका आदर्श व्यक्तिमत्त्वाचा, वाढदिवस एका युवा नेतृत्वाचा !!



वडवणी तालुक्यातील पुसरा या ठिकाणी अत्यंत गरीब परिस्थितीमध्ये जन्मात आलेले व्यक्तिमत्व लहानपणापासूनच समाजकार्याची आवड, शरद झोडगे हे नाव आपल्याला विविध सामाजिक कार्याच्या माध्यमातून अनेक वेळा ऐकण्यात येते,अत्यंत सामान्य कुटुंबात जन्मलेला हा मुलगा गेले अनेक वर्ष वेगवेगळ्या प्रकारच्या समाजकार्या मध्ये सदैव अग्रेसर असतो. शरद झोडगे हा वयाच्या २३ या वर्षी ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आला.रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे रुग्णसेवक शरद झोडगे ,गेल्या अनेक वर्षांपासून गरजू रुग्णांसाठी आशेचे किरण असलेले शरद झोडगे हे रुग्णांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी तत्पर असतात, कोविडच्या काळात त्याची उल्लेखनीय कामगिरी आहे,कोविड काळात कोणाला बेड भेटत नव्हता त्याला बेड उपलब्ध करून देण्यात आला, तसेच सर्व हॉटेल बंद असताना ज्यांचे उपजीविका भागत नव्हती त्यांनी स्वत: मित्र कंपनीसोबत घेऊन खिचडी वगैरे बनवून वाटप करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे, रस्त्यावर फूटपाथवर बेघर लोकांना दिवाळी फराळ वाटप,तसेच महापुरुषांची जयंती व पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,रक्तदान शिबिर, अन्नदान,मोफत आरोग्य तपासणी शिबिर, गरजू रुग्णांना योजनेमध्ये ऑपरेशन करून देणे, मुख्यमंत्री सहायता निधीचा लाभ मिळवून देणे अशा अनेक प्रकारच्या समाजकार्यात सदैव अग्रेसर असतात, आरोग्य क्षेत्राच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्यदुत बाजीराव दादा चव्हाण साहेब यांनी रुग्णसेवक शरद झोडगे यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उपजिल्हाप्रमुख पदी निवड केली, जिल्हा रुग्णालय असो वा खाजगी रुग्णालय असो जवळपास दिवसाचा दोन ते तीन तास वेळ हे हॉस्पिटलमध्ये घालवतात व रुग्णांच्या अडीअडचणी जाणून घेतात व त्यांना सोडवण्याचा प्रयत्न करतात. आशा सामाजिक व आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांना १)आदर्श युवा महाराष्ट्र युथ आयडल समाजरत्न पुरस्कार पुणे येथील संस्थेने दिला आहे तसेच बार्शी येथे २) राज्यस्तरीय व्यसनमुक्ती गौरव पुरस्कार देखील देण्यात आला आहे तसेच कोविड काळात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल ३) कोविड योद्धा पुरस्काराने देखील अनेक वेळा सन्मानित करण्यात आलेले आहे तसेच रयत सामाजिक प्रतिष्ठान बीड व जन्मभूमी सामाजिक प्रतिष्ठान रामगाव याही संस्थेने त्यांना पुरस्कार दिलेला आहे.

त्यांचा स्वत:चा वाढदिवस सुद्धा दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम घेऊन मित्र परिवाराच्या वतीने साजरा केला जातो असा या आदर्श व्यक्तिमत्वास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!!

# जलदगती चाचणी झाली पण इलेक्ट्रीक जोडणी अभावी बीडला रेल्वे धावेना

## सदोष रेल्वेपुल प्रकरणात कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

बहुचर्चित, बहुप्रतिक्षित आणि जिल्ह्याच्या विकासात मैलाचा दगड ठरणारा अहिल्यानगर –बीड– परळी लोहमार्ग पुर्णत्वाकडे जात असुन रेल्वे रूळ अंथरणे, रेल्वे स्टेशन उभारणीचे कामही मार्गी लागले असले तरी या मार्गावर इलेक्ट्रिक जोडणीचे काम रखडलेले असल्याने जलदगती चाचणी होऊनही बीडला रेल्वे कधी धावणार? असा प्रश्न बीडकरांना पडला आहे.

रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे या मागणीसह चऱ्हाटा रोडवरील पालवण फाटा येथील पावणे ३ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल पाडण्याचे काम सुरू आहे हा जनतेच्या पैशांचा अपव्यय असुन संबंधित अभियंता आणि कंत्राटदार यांच्याकडून नुकसानभरपाई वसूल करण्यात यावी व तसेच बहुतांश रेल्वे पुलाखाली पावसाळ्यात पाणी साचत असल्याने ग्रामस्थांना वाहतुकीची अडचण येते त्यामुळे पाण्याचा निचरा करण्याची उपाययोजना करावी या प्रमुख मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती



आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२८ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करून जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे, पांडुरंग हराळे, अशोक येडे जिल्हाध्यक्ष (आप), रामधन जमाले जिल्हाध्यक्ष (इंटक), जरांगे पाटील, किष्किंधा पांचाळ, शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील आदी सहभागी होते.

बीड रेल्वेसाठी गेल्या ४० वर्षांपासून स्वातंत्र्य सैनिक, रेल्वे मागणी आंदोलन समिती, रेल्वे कृती संघर्ष समिती, अनेक नागरीक युवा कार्यकर्ते यांनी रस्त्यावर उतरून संघर्ष केला आहे. वेळप्रसंगी आंदोलकांना जेलमध्येही जावे लागले आहे. अहिल्यानगर – बीड – परळी या २६१ किलोमीटर रेल्वे मार्गावरील ८० टक्के रेल्वे रूळ अंथरण्याचे आणि रेल्वे स्टेशन उभारणीचे काम कामही मार्गी लागले आहे. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड स्थानकापर्यंत रेल्वेची जलदगती चाचणी घेण्यात आली. या मार्गावरील इलेक्ट्रीक जोडणी काम अद्याप पूर्ण मार्गावर झालेले नाही हे काम पूर्ण झाल्यानंतरच नियमित रेल्वे सुरू होऊ शकते. सध्या विघनवाडी पर्यंत काम पूर्ण झालेले आहे. ईलेक्ट्रीक जोडणी अभावी बीडला रेल्वे धावण्याचे काम रखडले असुन या कामाला गती देऊन तातडीने पूर्ण करण्यात यावे.

**दिशा चुकली म्हणून पावणे तीन कोटींचा पुल पाडला**

पुल पाडण्यासाठी २० लाखाचा खर्च आणि नविन पुलासाठी १५ कोटी संबंधित अभियंता व कंत्राटदार यांच्यावर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करावी. बीड तालुक्यातील चऱ्हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल लोहमार्गाची व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने निरुपयोगी ठरला असुन रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरू आहे. आता पुल पाडण्यासाठी २० लाख रुपये खर्च असुन नविन पुल बांधण्यासाठी १५ कोटी रुपये खर्च येणार आहे. जनतेच्या पैशाचा अपव्यय असुन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून संबंधित रेल्वे विभागाचे अभियंता आणि लोहमार्ग पुलाचे काम करणारी ठेकेदार कंपनी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून नुकसान भरपाईची रक्कम शासन तिजोरीत जमा करण्यात यावी

**पावसाळ्यात रेल्वे पुलाखाली पाणी साचत असल्याने ग्रामस्थांची वाहतुकीची अडचण ; उपाययोजना करण्यात यावी**

बीड जिल्ह्यातील अहिल्यानगर –बीड– परळी या रेल्वे मार्गावरील रेल्वे पुलांची पाहणी करुन पुलाखालचे पाणी काढुन देण्याची व्यवस्था न केल्याने पाणी साचत असुन बीड तालुक्यातील पालवण चौक, नवगण राजुरी, जरूड, बाभुळखुंटा येथील रेल्वे पुलाखाली पाणी साचल्याने ग्रामस्थांची वाहतुकीची अडचण होत असुन संबंधित प्रकरणी आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.





# धारुर येथे मन बात कार्यक्रम आयोजिक

धारूर । प्रतिनिधी

धारूर येथील नगरसेवक रूपेश चिद्रवार यांच्या निवास स्थानी दि २७ जुलै रोजी देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचा मन की बात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या अजोजीत मन की बात कार्यक्रमात भारतीय जनतापार्टी प्रदेष कार्यकारणी सदस्य तथा नगरध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी, तालुकाध्यक्ष ॲड.बालासाहेब चोले, शहरध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे, भाजपा यूवामोर्च शहरध्यक्ष ॲड.मोहन भोसले, नगरसेवक बालासाहेब खामकर, नगरसेवक सचिन दुबे, नगरसेवक सुरेश लोकरे, नगरसेवक रूपेश चिद्रवार, खरीदी विक्री संचालक रामप्रभु मुंडे, सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी, राधाकृष्ण चोले, बालासाहेब चोले, सुरेश पिलाजी, महेश सत्वधर, संतोष काळे, शेख अनीस, मनेरी व सर्व पधाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रावण सोमवार निमित्त चिंतेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी
# परिसर 'हर हर महादेव'चा जयघोषाने दुमदुमला

गेवराई । प्रतिनिधी

श्रावण महिन्याला प्रारंभ झाला असुन श्रावणातील पहिला सोमवार आहे. श्रावण महिना हा भगवान शंकरांचा प्रिय महिना आहे. या महिन्यात अनेक सण–उत्सव आणि विविध प्रकारची व्रतवैकल्ये केली जातात. श्रावण महिना महादेवांना पूर्णपणे समर्पित आहे. श्रावणात भगवान शंकरांची मनोभावे पूजा केल्याने आपल्या मनातील सर्व मनोकामना पूर्ण होतात, असे ज्येष्ठ, महिला व नागरिकांकडून बोलले जात आहे. श्रावण मासातील पहिल्या सोमवार. यानिमित्त भाविकांनी गेवराई शहरातील भगवान चिंतेश्वर महादेवाच्या मंदिरात गर्दी केली आहे. महादेवाच्या दर्शनासाठी लांबच– लांब रांगा लागल्या आहेत. यावेळी मंदिर परिसर 'हर हर महादेव'चा जयघोषाने दुमदुमला आहे. श्रावणाला व्रतवैकल्यांचा महिना म्हटला जातो. श्रावण महिना शिवपूजनासाठी अतिशय महत्वाचा आणि पवित्र महिना मानला जातो. श्रावणात भगवान शंकराची पूजा केली जाते.



सविस्तर वृत्त असे की श्रावण मासाचा पहिला सोमवार असल्याने हजारो भाविक श्री. चिंतेश्वर संस्थान येथे गेवराईकरांचे आराध्य दैवत असणारे चिंतेश्वर मंदिर मनोभावे पूजा करून दर्शन घेतात. पवित्र श्रावण महिन्यात चिंतेश्वराचे दर्शन घेण्यास मोठे धार्मिक महत्त्व असून, या महिन्यात सर्वच महादेवाच्या मंदिरात भाविकांची दर्शनाकरिता गर्दी असते.

श्रावण महिन्यातील पहिला सोमवार असल्यामुळे सकाळी पहाटेपासूनच गेवराच्या चिंतेश्वर मंदिरात भाविकांनी गर्दी केली. गेवराई शहरातील विद्रूपा नदीच्या काठावर वसलेले प्राचीन शिव मंदिर भगवान चिंतेश्वर या नावाने गेवराई सह पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे श्रावण महिन्यानिमित्त येथे मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येतात गेवराई शहरासह पंचक्रोशीतील महिला पुरुषासोबत लहान– मुले वृद्ध येथे दर्शनासाठी गर्दी करतात. गेवराई येथील चिंतेश्वर मंदिर प्राचीन असून येथे भक्तांची नेहमी गर्दी असते . सुरू असलेल्या पवित्र श्रावण महिन्यातील पहिला सोमवार असल्यामुळे भाविकांनी पहाटेपासूनच मोठी गर्दी केली. परिसरात हर हर महादेवाचा जयघोष पाहायला मिळाला.

# कारगिल युद्ध विजय स्मृतिदिनी शहिदांना महामानव अभिवादन ग्रुप तर्फे विनम्र अभिवादन
## कॅप्टन राजाभाऊ आठवले यांचा सत्कार संपन्न

बीड । प्रतिनिधी

नापाक इराद्याने भारत भूमीवर आक्रमण केल्यामुळे पाकिस्तान विरुद्ध १९९९ साली कारगिल युद्ध करावे लागले व त्यात भारताने विजय प्राप्त केला. आपल्या भारत भूमीचे रक्षण करण्याकरिता अनेक जवान शहीद झाले. त्यांच्या पावन स्मृतीस कारगिल युद्धाच्या विजयी स्मृतिदिनी महामानव अभिवादन ग्रुपने महामानव महिला नागरी सहकारी पतपेढी धानोरा रोड बीड येथे शहिदांना भावपूर्ण विनम्र अभिवादन करून त्या युद्धात सहभागी असलेले कॅप्टन राजाभाऊ आठवले यांचा सत्कार संपन्न केला.

कार्यक्रमाचे अध्यक्षपदी से नी जिल्हा प्रबंधक (एलआयसी) यु.एस.वाघमारे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वासनिक यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रशांत वासनिक उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले की भारतीय सीमेवर तैनात असलेली सैनिक रात्रनदिवस सतर्क राहून आपले शीर तळहातावर घेऊन सीमेचे व आपल्या नागरी जीवनाचे संरक्षण करीत असतात. त्यात त्यांना काही वेळा वीर मरण देखील पत्करावे लागते. त्यांच्या ह्या असीम त्यागाचे आपण सर्वच नेहमी कृतज्ञ असावयास पाहिजे. देशाचे संरक्षण करताना,



मी प्रथम भारतीय आहे आणि अंतिमत: भारतीय, हि राष्ट्र संकल्पना मनात पक्की रुजवून प्राणपणाला लावून सीमा रक्षण करीत असतात. सत्काराला उत्तर देताना कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी सांगितले की, उंच उंच बर्फाळ दरी डोंगरात सैनिकांना कशा कशा प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागते हे वर्णन चित्रफीत दाखवल्याप्रमाणे उपस्थितांसमोर युद्धचे चित्र उभे केले तेव्हा त्यांनी वर्णन केलेल्या परिस्थितीच्या कल्पनेनेच अंगावर काटे उभे राहिले व प्रत्येकाच्या हृदयाचा ठोका चुकतो की काय असे वाटले. अध्यक्षीय समारोपात अध्यक्ष महोदय यांनी नौदल, भूदल व वायुदल मधील सैनिक देश रक्षणाकरिता २४ तास कसे सतर्क असतात हे सांगून नागरी जीवन जगत असताना राजकीय मतभेद कितीही असले तरी देश प्रथम यालाच प्रथम प्राधान्य देऊन सर्वांनी गुण्यागोविंदाने राहून आप आपल्या परीने कार्य करून देश सेवा कशी घडेल याची काळजी घेणे सर्वांच्या हिताची आहे हे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम.राऊत यांनी केले तर प्रास्ताविक महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष आयु जी.एम.भोले यांनी केले. कार्यक्रमास डी.जी. वानखेडे, ॲड तेजस वडमारे, काशिनाथ वाघमारे, बी.डी.तांगडे व बहुसंख्य सदस्य उपस्थित होते.



बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक शहर असणाऱ्या धारूर येथील महादुर्ग गडाच्या विषयी विविध मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री देवेंदे फडणवीस यांना स्व.आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्या माध्यमांतून दिले. लवकरच मुख्यमंत्री यांच्याशी या संदर्भात चर्चा करून मागण्या पूर्ण करून घेऊ असा विश्वास पाटील यांनी दिला. त्यावेळी जागर प्रतिष्ठानचे विशाल जाधव, चंद्रशेखर दादा कदम, आदिनाथ शिंदे, अशोक आगे, गोरख चव्हाण, ऋषिकेश नाटकर आदी शिलेदार उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळांना भौतिक सुविधा पुरविण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रयत्नशील आहे : आ. लोणीकर

जालना । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील पालकांच्या विद्यार्थ्यांचे अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शिक्षकांनी कर्तव्यदक्षतेने अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळांना भौतिक सुविधा पुरविण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. परतूर तालुक्यातील नवोदय विद्यालय आंबा येथे गट साधन केंद्र परतूरच्या वतीने तालुकास्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षणाधिकारी श्रीमती संगिता भागवत यांची उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर गट विकास अधिकारी राजकुमार तांगडे, उपशिक्षणाधिकारी श्रीमती वीनया वडजे, गटशिक्षणाधिकारी अशोक सोळंके, उपप्राचार्य राम मस्के, एकमूल एकझाड राज्य समन्वयक ए.एस. नाथन शिक्षण विस्तार अधिकारी बाबासाहेब तरवटे, गट समन्वयक कल्याण बागल, केंद्रप्रमुख शंकर थोटे, विष्णू ढवळे, राम सोळंके, संपत आढे, देविदास जोगडे, आश्विन गुंजकर, माऊली लहाने श्रीमती आशाताई मगरे यांची उपस्थिती होती.

दरम्यान शिक्षणाधिकारी श्रीमती संगीता भागवत यांनी बोलतांना म्हटले की, शिक्षण हक्क कायद्यामुळे शिक्षकांची भूमिका अधिक महत्त्वपूर्ण झाली आहे. शिक्षकांनी या कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत पालन करावे. प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी अध्यापनात अध्ययन निष्पत्तीचा वापर करून, विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन करावे आणि विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देण्यास मदत करावी.तसेच शिष्यवृत्ती, नवोदय, एनएमएमएस आणि प्रज्ञाशोध स्पर्धा परीक्षांसाठी अधिक विद्यार्थ्यांना विहित वेळेत अर्ज सादर करण्यासाठी प्रेरित करावे. स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासक्रमाची माहिती देत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सातत्याने योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे निरसन करावे आणि वेळोवेळी पालकांच्या भेटी घेऊन पालकांचे समुपदेशन करावे, शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत असलेल्या नियमांचे पालन करून शाळेत विद्यार्थी सुरक्षेसाठी जागरूकता बाळगावी अशा सूचना यावेळी शिक्षणाधिकारी श्रीमती संगीता भागवत यांनी शिक्षकांना दिल्या.

यावेळी तालुक्यातील उत्कृष्ट काम करणाऱ्या शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांचा सत्कार करण्यात आला तसेच तालुक्यातील निवड झालेल्या २० आयडियल उपक्रमशील शिक्षकांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी अशोक सोळंके यांनी तर सूत्रसंचालन जावेद पठाण आणि डॉ.श्रीमती स्मिता रोडगे यांनी केले आभार प्रदर्शन शिक्षण विस्तार अधिकारी बाबासाहेब तरवटे यांनी केले.

# दिंद्रुड चा कोतवाल शुभम बनला राज्य राखीव पोलीस दलातील जवा

दिंद्रुड । प्रतिनिधी

नऊ वर्ष महसूल मंडळात कोतवाल म्हणून काम केले, पोलीस दलात जाण्याची आईची इच्छा पूर्ण करण्यासाठी बंद खोलीत अभ्यास केला, रात्रंदिन अंग मेहनत घेतली, शेवटी फळ मिळाले आणि दिंद्रुड चा कोतवाल शुभम राज्य राखीव पोलीस दलातील जवान झाला. माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड नजदीक असलेल्या चोपनवाडी हे शुभम काटेचे गाव आहे. घरची परिस्थिती प्रचंड हालाखीची, आई सविता या आशा वर्कर तर वडील मुकुंद हे शेतात काम करतात. नऊ वर्षांपासून शुभमने कोतवाल म्हणून दिंद्रुड तलाठी सज्जात काम केले.

राज्य राखीव पोलीस दलातील मामाची प्रेरणा घेत मला ही पोलीस व्हावे हि आईची इच्छा पुर्ण करायची होती.त्यासाठी गेल्या ४ वर्षांपासून कोतवाल हि जवाबदारी पार पाडत अभ्यास व प्रचंड अंग मेहनत घेतली. दिंद्रुड सज्जाचे तलाठी प्रमोद चव्हाण सह आई वडिलांनी प्रोत्साहन दिले या बळावर शुभम काटे ची राज्य राखीव पोलीस दलातील जवान म्हणून प्रशिक्षणासाठी ७ ऑक्टोबर २०२४ रोजी निवड झाली. राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र नानवीज, दौंड येथे नुकतेच प्रशिक्षण पुर्ण झाले. यापुढे राज्य राखीव पोलीस बलात सशस्त्र पोलीस शिपाई म्हणून काम करताना आता आई–वडिलांची व जनतेची सेवा करायला मिळणार याचा आनंद असल्याची शुभम काटे सांगतो.

माझा मुलगा शुभम मेहनती व प्रामाणिक आहे, त्याची पोलीस होण्याची जिद्द शेवटी पूर्ण झाली. आता तो देशात नागरिकांची सेवा करेल याचा आनंद आहे. भविष्यात मोठा अधिकारी व्हावा हेच माझे स्वप्न आहे.

**–सविता मुकंद काटे, आई**

शुभम काटे हा कोतवाल असताना सांगितलेले कामे प्रमाणिकपणे पूर्ण करणारा, ध्येय पूर्ण करण्यासाठी चिकाटीने अभ्यास करणारा तसेच दिंद्रुड महसूल सज्जाचा होतकरू कर्मचारी होता. त्याची एसआरपीत भरती झाल्याचा आनंद आहे.

**– प्रमोद चव्हाण, तलाठी दिंद्रुड सज्जा**



## मनोरंजनार्थ खेळ चालवण्यात येणाऱ्या ठिकाणी गुटका, तंबाखू, धूम्रपान आणि मद्यपान

# उपविभागीय पोलीस अधिकारी आणि ठाणे प्रमुखांची डोळेझाक?

तलवाडा | प्रतिनिधी

मनोरंजनाच्या नावाखाली कॉइन च्या आडून पैशाने जुगार खेळवला जातो हे सर्वश्रुत आहे, परंतु ज्यांनी शाखा चालविण्यास दिल्या त्यांच्या डोळ्यात धूळफेक करत शाखा चालवणारे याठिकाणी चक्क तेरा पानाच्या रामी च्या नावाखाली पैशाने जुगार खेळवतात. याच ठिकाणी शासनाने बंदी घालण्यात आलेला गुटका हा सभासदांना उघडपणे खाण्यासाठी पुरवण्यात येतो, याच बरोबर तंबाखू, धूम्रपान यासह सभासदाच्या मागणी खातर मद्यपान ही आणून दिले जाते जे नियबाह्य आहे. याकडे पोलिस प्रशासन अर्थपूर्ण दुर्लक्ष करत असल्याने पोलिस प्रशासनाची आणि अधिकारी कर्मचाऱ्यांची हतबलता दिसून येते, थोड्या पैशासाठी आपला असे का ? असा संतप्त सवाल आता नागरिकांमधून उपस्थित होत आहे. जनतेचे रक्षकच जर थोड्या पैशासाठी अवैध धंद्यावल्याची हुजरेगिरी करत असतील तर यामध्ये प्रामाणिक काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना ही लाज वाटेल अशी परिस्थिती निर्माण झाल्या शिवाय राहणार नाही हे नक्की. याच जुगारामुळे अनेकांची संसार उध्वस्त झाली आहेत आणि आजही होत आहेत त्यामुळे हे बंद होणे गरजेचे असल्याचे सर्व सामान्य नागरिक बोलत आहेत. तालुका आणि ग्रामीण च्या अधिकाऱ्यांनी पोलिस अधीक्षक यांच्या आदेशाला न जुमानता ही सुरू ठेवले असल्याने आता पोलिस अधीक्षक हे बंद करतात का याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

जिल्ह्यात नव्याने रुजू झालेले पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांच्या आदेशाने जिल्ह्यातील सर्वच अवैध धंदे बंद करण्यात आले होते. यामध्ये पत्त्यांचे क्लब, मटका, गुटखा, ऑनलाइन सट्टा, वाळू चोरी, दारू विक्री यासह विविध अवैध धंद्याचा समावेश होता हे काही दिवस काटेकोर पने बंद करण्यात आले होते परंतु आता हळूहळू हे सर्व धंदे बिनबोभाट सुरू झाले आहेत ज्या ज्या ठिकाणी हे अवैध धंदे सुरू झाले. त्या त्या ठिकाणच्या तालुका उपविभागीय पोलिस अधिकारी आणि ठाणे प्रमुख यांची संमती घेऊन आर्थिक तडजोडीतून सुरू करण्यात आले आहेत यासाठी वसुली होत असून ही वसुली काही ठिकाणी खाजगी मध्यस्थी मार्फत पोलिस कर्मचारी करतात तर काही ठिकाणी पोलिस कर्मचारी स्वत: करतात.

सामान्य जनता यांच्याकडे कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवणारे आणि जनतेचे रक्षक म्हणून पाहते परंतु थोड्या पैशासाठी यांनी आपला ईमान या दोन नंबर धंदा करण्यावाल्या जवळ गहाण ठेवला का असा प्रश्न? पडतो. हे यासाठी की जिल्ह्यात सगळीकडे पत्त्यांचे क्लब बंद आहेत परंतु आता नव्याने दारू दुकानाच्या शाखा वाटाव्या तशा मनोरंजनार्थ ज्याला बुद्धी कौशल्य नाव देण्यात आले या शाखा अस्तित्वात आल्या असून याठिकाणी कॅरम, बुद्धिबळ, बॅटमिंटन, हॉलिबॉल, यासारखे बुद्धी कौशल्याचे वस्तू फक्त दिखावा करण्यासाठी आणून ठेवले आहेत. परंतु तेरा पत्त्याची रमी मात्र सर्व सभासद आणि शाखा पदाधिकारी खेळतात हे नवलच आहे. हेच पत्ते साधे गणपती बसवल्यास त्या समोर खेळले तरी पोलिस त्यांना जुगारी म्हणून पकडून कार्यवाही करतात परंतु या ठिकाणी हाच खेळ पैशाने खेळला जातो त्याला मनोरंजन म्हणतात ही शोकांतिका आहे आणि पोलिस प्रशासनाची नाचक्की, कारण याठिकाणी कोणत्याही सभासदाला करमणूक करायची नसते. हे सर्व पैशाने जुगार करतात या ठिकाणी येणाऱ्या सभासदांकडून रोकड जमा करून घेऊन त्याला कॉइन देण्यात येतो ज्याच्याकडे रोख पैसे नाही त्याच्याकडून ऑनलाइन फोन पे, गुगल पे द्वारे पैसे जमा करून घेऊन त्याला खेळण्यासाठी कॉइन दिले जातात ही बाब स्थानिक पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांना चांगलीच माहिती आहे परंतु याठिकाणहून आर्थिक मलिदा मिळत असल्याने काहीच कार्यवाही नकरता यातून बाहेर पडण्याचा मार्ग पाहतात ही केविलवाणी बाब आहे.

तसेच या ठिकाणी कायद्या नुसार आणि नियमानुसार गुटका, धूम्रपान, तंबाखू आणि मद्यपान यासारखे व्यसन करता येत नाहीत, हे व्यसन करणाऱ्या सभासदाला, व्यक्तीला याठिकाणी प्रवेश देता येत नाही, दिला जाऊ नये, देण्यात येऊ नये हे नियम असताना शाखा चालवणारे या सर्व गोष्टी पुरवत असतील तर हा कोणता कायदा आणि नियमानुसार खेळ चालतो हे पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निर्दशनास येत नसावे का ? असा प्रश्न उपस्थित होतो. कायद्याने यावर कडक कार्यवाही करून ही तत्काळ बंद करावे अशी मागणी वेळोवेळी करण्यात आली आहे याबाबत अनेक वृत्तपत्रात वृत् प्रकाशित झाले आहेत यावर ही कार्यवाही होत नसेल तर पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी या प्रकरणी लक्ष घालून हे तत्काळ बंद करावे अशी मागणी सामान्य जनतेतून करण्यात येत आहे.



### जिल्हात एका ठिकाणी कार्यवाही होऊ शकते मग गेवराई तालुका जिल्ह्याच्या बाहेर आहे का?


बीड जिल्ह्यात नवगण राजुरी परिसरात तळेगाव शिवारात बीड ग्रामीण पोलिसांनी जुगार अड्ड्यावर कार्यवाही केली त्या ठिकाणी ही बाहेर, सांस्कृतिक कला मंडळ असा बोर्ड लावूनच जुगार खेळला जात होता त्या ठिकाणी बीड ग्रामीण पोलिसांनी धाडसी कार्यवाही केली, मग गेवराई तालुक्यातील पोलिसांनी झोपेचे सोंग का घेतले असा प्रश्न उपस्थित होत असून, हे आर्थिक तडजोडीतून सुरू आहे अशी चर्चा आता उघड उघड होत आहे. त्यामुळे पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांची प्रतिमा नक्कीच डागाळली जाईल हे दिसून येते, आता तरी उपविभागीय पोलीस अधिकारी आणि पोलीस ठाणे प्रमुख कार्यवाही करणार का याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

# गेवराई तालुक्यातील प्रेमीयुगल जोडप्याला अंमळनेर पोलिसांनी पकडले

## अंमळनेर पोलिसांची ऑल आऊट ऑपरेशनमध्ये धडाकेबाज कामगिरी

गेवराई | प्रतिनिधी

पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत आणि अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या आदेशानुसार बुधवारी रात्री ऑल आउट ऑपरेशन राबविण्यात आले या नाकाबंदीत गेवराई पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल असलेले प्रेमीयुगल जो पुण्याच्या दिशेने जात असताना ताब्यात घेण्यात अंमळनेर पोलीसांना यश आले आहे.



गेवराई पोलीस ठाण्यात विष्णू राठोड रा. निपाणी जवळका, ता. गेवराई यांनी त्यांची २० वर्षीय मुलगी मिसिंग असल्याची तक्रार दाखल केली होती. या मिसिंग मधील मुलीचा शोध गेवराई पोलीस घेत असतानाच अंमळनेर पोलिसांकडून केलेल्या नाकाबंदी मिसिंग मधील युवती ही त्याच गावातील एका मुलासोबत पुण्याच्या दिशेने जात असल्याचे दिसून आल्याने त्या जोडप्याला ताब्यात घेऊन अंमळनेर पोलीस ठाण्यात आणून कायदेशीर प्रक्रिया करून सदरील जोडप्याला गेवराई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. अंमळनेर पोलीसांकडून राबविण्यात आलेल्या नाकाबंदीत हि वाहनांची व वाहनात असलेल्या इसमांची कसून चौकशी करण्यात आल्याने गेवराईतील सिसीम मधील जोडपं अंमळनेर पोलीसांच्या हाती लागले होते. अंमळनेर मध्ये पोलीसांच्या राकाबंदीत मिळून आलेल्या प्रभीविकांना ठाण्यात आपले यावेळी ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक भार्गव सपकाळ पीएसआय कृष्णा चहाण यांच्या सह एपीआय भार्गव सपकाळ यांचे क्राईम रायटर योगेश बहिरवाल, पोलीस कॉन्स्टेबल शाम खाडे, पोलीस हवालदार साईनाथ जाधव, भारत राठोड, महिला पोलिस कर्मचारी शितल काकडे हे उपस्थित होते.



# नागोबा गल्ली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह दुरुस्त करा : जोगदंड

बीड | प्रतिनिधी

नागोबा गल्ली पेठ, बीड येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा असून त्या सभागृहाची नगर पालिकेने दुरुस्ती व साफसफाई १५ वर्षापासून केलेले नसून सभागृहामध्ये दरवाजे खिडक्या व पत्र्याचे छत खराब झालेले असून त्यामुळे सभागृहामध्ये तेथे गोर गरीब लोकांच विवाह सोहळे व सांस्कृतिक कार्यक्रम करत होते. परंतु सभागृहाची दुर अवस्थता झाल्यामुळे तेथील शुभ कार्य बंद झालेली आहेत. व सभागृहाला पत्र्याचे छत असून ते खराब झाल्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकरता येत नाही. व सभागृहाच्या परिसरामध्ये अतिक्रम केलेले आहे व सभागृहाजवळ गहाण व सांडपाणी तेथे साठवत असून तेथील सभागृह दूरअवस्था झालेली आहे. निवेदन देते प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते राजू जोगदंड, अविनाश जोगदंड, प्रभाकर चंदने, विलास जोगदंड, अक्षय कोकाटे, भैय्या वाघमारे, सनी जोगदंड आदि उपस्थित होते.

सभागृहामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे छत कोसळून विटंबना व नुकसान होण्याची शक्यता आहे. व तसेच पुतळ्याचे नुकसान व जिवीत हाणी झाल्यास त्यास सर्वस्वी नगर परिषद बीड जबाबदार राहील याची दक्षता घेण्यात यावी. सभागृहाची व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची दुरुस्ती न केल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) बीड शहर पदाधिकारी व नागरिक घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने अंदोलन करण्यात येईल व काही अनुचित प्रकार घडला तर याला सर्वस्वी जबाबदार नगरपालिका प्रशासन असेल असे निवेदन रिपाई चे शहराध्यक्ष अविनाश जोगदंड यांच्यासह विशिष्ट मंडळांनी यांनी दिले आहेत.

# धारूरच्या प्रतिभा नगर भागात तीन महिन्यांपासून नळाला पाणी नाही


## अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षतेमुळे भरपावसाळ्यात नागरिकांचे हाल

धारूर | प्रतिनिधी

शहरात नवीन पाइपलाइनचे काम सुरू असून, करत असताना प्रतिभानगर येथील जुनी पाइपलाइन निकामी करून नवीन पाइपलाइनचे काम करण्यात आले. जुनी पाइपलाइन बंद झाल्याने तीन महिन्यांपासून नळाला पाणी येत नसल्याने नागरिकांचे भरपावसाळ्यात हाल होत आहेत. पाणी सुरळीत करण्यासाठी नागरिकांनी सीओंना निवेदन देऊन मागणी करून आज आठ दिवस उलटूनही कसल्याच प्रकारचं काम सुरू केलं नाही अधिकारी यांच्या दुर्लक्षेतेमुळे परिसरातील नागरिकांना तीन महिन्यांपासून पाणीटंचाईचा सामना सोसावा लागत आहे. धारूर शहरामध्ये कुंडलिका धरणातून पाणीपुरवठा केला जातो.

शहरात नव्याने पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू असून, प्रतिभानगर येथे नवीन पाइपलाइनचे काम सुरू असताना जुनी पाइपलाइन काढून टाकण्यात आल्याने सध्या पाणीपुरवठा तीन महिन्यांपासून बंद आहे. नवीन कलेक्शन देऊन नव्या पाइपलाइनने देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु परंतु काम काम बंद करण्यात आले. तीन महिन्यांपासून नळाला पाणी येत नसल्याने नागरिकांना विकत पाणी घ्यावे लागत आहे. या पाइप लाइनमुळे रस्त्याची रस्त्याची दुर्दशा झाली आहे.

नळाला पाणी सोडावे आणि रस्ता सुरळीत करावा, अशी मागणी असून, मागणीची दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशाराही परिसरातील नागरिकांनी दिला असून तात्काळ पाणी प्रश्न मार्गी लावा अशी मागणी मुख्याधिकारी यांच्याकडे नागरिकांनी केली आहे. निवेदन देता वेळी परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



# नियम तोडणाऱ्या वाहनांवर धारूर पोलिसांनी केली दंडात्मक कारवाई

धारूर | प्रतिनिधी



बीड जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कावत यांच्या आदेशाने संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या वाहनावर कारवाई करण्यात येत आहे, जिल्हा अधिक्षकांच्या आदेशानुसार धारूर पोलीस यांच्या वतीने वाहतूक नियम तोडणाऱ्या वाहणावर धारूर केज रोडवर टोल नाक्यावर नियम तोडणाऱ्या वाहनावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. ही कारवाई धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे व उप निरीक्षक मुकुंद ढाकणे व त्यांच्या सर्व टिम कडून करण्यात आली दि. २७ जुलै रविवार रोजी दुपारच्या दरम्यान केज रोड वरिल धारूर टोल नाक्यावरती नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनावरती दंडात्मक कारवाई करण्यात आली, या वेळी किल्ले धारूर पोलीस स्टेंशनचे उपपोलीस निरीक्षक मुकुंद ढाकणे यांच्या पथकाकडून नियम मोडणाऱ्या अनेक वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

# मानवी हक्क अभियानची खेर्डावाडी येथे वाडीत शाखा स्थापन

गेवराई | प्रतिनिधी

आज खेर्डावाडी तालुका गेवराई जिल्हा बीड येथे मानवी हक्क अभियानाच्या शाखेचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात करण्यात आले. मानवी हक्क अभियानाची जिल्हाध्यक्ष राजेश भाऊ क्षीरसागर यांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख उपस्थिती मानवी हक्क अभियानाचे तालुकाध्यक्ष धोंडीबा हातागळे कर्मवीर एकनाथराव आवाड ऊसतोड कामगार संघटना तालुका अध्यक्ष मारुती दादा भिसे आणि तेथील प्रमुख कार्यकर्ते बळीराम भिसे, युवा नेते धम्मा त्रिभुवन, रामा भिसे, ऋषिक त्रिभुवन, सुमित त्रिभुवन, नऊनाथ देवकुळे, राजेंद्र देवकुळे, नितीन भिसे, दत्ता चौरे, भीमा भिसे, मिलिंद भिसे, अजय भिसे, महादेव भिसे, मसुराम देवकुळे, पवन घोडे, लक्ष्मण देवकुळे, द्यानेश्वर भिसे, तुकाराम भिसे उपस्थित होते.



# समाजाचा द्वेष झाला म्हणून आम्ही मात्र कुणाचाही द्वेष करणार नाही : धनंजय मुंडे

## एकोप्याने राहून एकमेकांना सहाय्य करू : पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने; अनेक मान्यवरांचा विशेष गौरव

केज | प्रतिनिधी

राजकारणात आणि सामाजिक जीवनात सक्रिय झाल्यापासून आजपर्यंत माझ्यावर अनेक संकटे, अनेक संघर्ष आले, त्यांना मी सामोरे गेलो. मात्र यावेळी सलग २०० दिवस माझी मीडिया ट्रायल चालवली गेली. मी, माझे आई – वडील, माझी मुले – बाळे, माझी जात, माझा जिल्हा, माझी माती या सगळ्यांची बदनामी केली गेली. त्या सर्व बदनामीला मी संयमाने तोंड दिले. जात म्हणून अनेकांनी सातत्याने द्वेष भावनेने टीका टिप्पणी, आरोप केले. कुणी व्यक्ती दोषी असेल तर त्याला जरूर फाशी द्या, चुकीचे समर्थन कुणीच करणार नाही; समाज म्हणून तरीही आमचा जो द्वेष केला त्याला मात्र आम्ही द्वेषाने उत्तर देणार नाही. आम्हाला स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब, स्व. पंडित अण्णा मुंडे यांनी सर्वसमावेशक कार्याची शिकवण दिलेली आहे. उलट आज जे जात म्हणून द्वेष करत आहेत, उद्या त्यांनीच आपल्याला सन्मानाची भावना व्यक्त करावी, असे काम एकत्रितपणे करून दाखवू, अस प्रतिपादन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी ठाणे येथील कार्यक्रमात बोलताना केले आहे.




ठाणे शहरातील टीप टॉप प्लाझा येथे सकल वंजारी समाजाच्या वतीने वंजारी समाज अधिवेशन व विचार मंथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते; या प्रसंगी श्री. मुंडे बोलत होते. यावेळी मागील २०० दिवस कोणत्याही गोष्टीवर व्यक्त न झालेल्या धनंजय मुंडे यांनी आज आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. मी स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांचा संघर्ष अगदी जवळून पाहिला व अनुभवला आहे. मुळात संघर्ष हा आपल्या रक्तात आहे व तो आपण शेवटपर्यंत आवश्यकता असेल तिथे करत राहू, असेही धनंजय मुंडे म्हणाले. या काही महिन्यांच्या काळात अतिशय शांत राहून मी विरोधकांना उत्तर दिले नाही, सर्वजण म्हणायचे धनंजय प्रत्युत्तर का देत नाही, मात्र मी मनाशी ठरवले होते की प्रत्युत्तर द्यायचे नाही. पण काहींनी याचा गैरफायदा घेत आमच्या अस्मिता दुखावल्या. काहींनी तर गुणवत्तेवर आधारित नोकऱ्या मिळवलेल्या अधिकारी कर्मचारी यांची जात काढून त्यांना टोकाचा त्रास दिला, अगदी शासनाचे धोरण असलेल्या बिंदू नामावली वरून सुध्दा टार्गेट केले गेले, तेही सहन केले, मात्र आमच्या अस्मिता आणि गुणवत्तेवर आक्षेप घेणाऱ्यांना सांगतो, आता बास! यापुढे सहन करणार नाही; अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी अनभिक्षिप्त इशारा दिला आहे.

या अधिवेशनाच्या माध्यमातून समाजातील गुणवत्तेच्या आधारावर आपल्या जीवनात उच्च पद प्राप्त करून प्रशासकीय सेवा, वैद्यकीय सेवा, पत्रकारिता, उद्योग अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिमानास्पद कामगिरी करून दाखवली, त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रशासकीय सेवेत प्रधान सचिव म्हणून उत्तम कामगिरी करणाऱ्या सुमंत भांगे यांच्याबाबत बोलताना धनंजय मुंडे यांनी मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा जो शासन निर्णय राज्य सरकारने घेतला, तो स्वतः सुमंत भांगे यांनी ड्राफ्ट केलेला होता, याचाही आवर्जून उल्लेख श्री. मुंडे यांनी केला. ज्याला जातीयवाद करायचा त्यांना खुशाल करू द्या, आपण मात्र कधीही कुणाची जात पाहून काम करणार नाहीत. स्व. मुंडे साहेब व स्व. पंडित अण्णा मुंडे यांनी सर्वसमावेशक कामाची शिकवण दिली, त्यातून वाटचाल करत असताना आजवर जात पाहून मी कधी राजकारण केले नाही, ज्या दिवशी जात पाहून राजकारण करण्याची वेळ येईल, त्यादिवशी राजकारण सोडून देईन, असेही धनंजय मुंडे यावेळी बोलताना म्हणाले.

या वाईट काळात सातत्याने समाजाने माझ्या पाठीशी खंबीर ताकत उभी केली, माझ्या कातडीचे जोडे करूनही मी ते ऋण फेडू शकणार नाही. आपली परंपरा व अस्मिता जोपासण्यासाठी तसेच स्पर्धा परीक्षा करणाऱ्या मुलांना मोठ्या शहरांमध्ये वसतिगृहे व अन्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री यांनी आपल्याला सूचना केलेली असून, त्यासाठी कुणाकडेही मागणी करणार नाही, आपला हक्क आपण मिळवू, असे ठाम मत यावेळी मुंडेंनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनीही मार्गदर्शन केले. वंजारी समाज आज प्रगतीच्या वाटेवर असताना सर्वांना सोबत घेऊन चालावे. एकोप्याने राहून एकमेकांना शिक्षण आणि सदाचाराचा संदेश देऊ, असे त्यांनी आवर्जून नमूद केले.

यावेळी व्यासपीठावर माजी प्रधान सचिव सुमंत भांगे, यांच्यासह प्रशासकीय सेवा, वैद्यकीय सेवा, शिक्षण, उद्योग, पत्रकारिता, क्रीडा, साहित्य, संस्कृती इत्यादी क्षेत्रातील मान्यवरांचा तसेच यूपीएससी व एमपीएससी सह विविध स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या नवनिर्वाचित अधिकाऱ्यांचा विशेष गौरव सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन आयोजक तथा भारतीय रेल्वे बोर्डाचे सदस्य धनराज गुट्टे यांनी केले, तर स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. अमोल गित्ते यांनी भूमिका बजावली.

व्यासपीठावर माजी आ. संजय दौंड, लातूर जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, ज्येष्ठ नेत्या सुशीला ताई मोराले, धुळे महापालिकेचे माजी महापौर प्रदीप करपे, मीराबाई संस्थानच्या महंत ह. भ. प. राधा ताई सानप, आदिनाथ महाराज, पानेगावकर महाराज, यांच्या सह विविध पक्ष, संघटनेचे पदाधिकारी, आजी माजी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय सेवेतील अधिकारी आदी उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT